# महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ

(शासनाचा सार्वजनिक उपक्रम)
**विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर.**
प्लॉट नं. ब-२६, एम.आय.डि.सी. एरिया, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.
फोन/फॅक्स -०२४०-२३३३८११,टोल फ्री नं - १८००१२१८०६६ इमेल-aurangabad.ro@mswc.in


## निविदा (Short Tender Notice)

महामंडळाचे जांबरगाव, ता. वैजापूर, जि. छ. संभाजीनगर येथील सायलो साठवणूक सुविधा व वजनकाटा (वे-ब्रीज) भाड्याने देणेबाबत.

स्वारस्य अभिव्यक्ती (EOI)

हिंदु हृदयसम्राट बाळासाहेब ठाकरे समृद्धी महामार्गालगत गट नं.२४५ मौजे जांबरगाव, ता. वैजापुर, जि. छत्रपती संभाजीनगर येथे ९.३८ हेक्टर आर क्षेत्रावर महाराष्ट्र राज्य वखार महामंडळाने ॲग्रो लॉजिस्टिक पार्क उभारले आहे. सदर पार्क मध्ये प्रत्येकी ३००० मे.टन क्षमतेचे अशी दोन गोदामे, १०,००० मे. टन क्षमतेचे सायलो, क्लिनिंग ग्रेडिंग यार्ड (C&G Machine), सामाईक सुविधा केंद्र (CFC Building), शेतकरी निवास, प्रयोगशाळा, वजनकाटा, उपहार गृह, ट्रक टर्मिनल, पेट्रोल पंप इत्यादी सुविधा निर्माण केल्या आहेत. जांबरगाव येथील एकुण १०००० मे.टन क्षमतेचे सायलो सुविधा (प्रत्येकी २५०० मे.टन x ४ सायलो) व वजनकाटा (६० मे. टन) या सुविधा प्रति माह किमान भाडे दर रू.५०/- प्रति मे.टन प्रमाणे ११ महिन्यांकरिता प्रायोगिक तत्वावर भाडे करारावर द्यायचे आहे. सायलो भाडे करारावर दिल्यानंतर साठवणुक क्षमतेचा वापर ५०% पेक्षा कमी झाल्यास किमान ५०% साठवणुक क्षमतेचे (५००० मे.टन) भाडे देय राहील. तसेच ५०% पेक्षा जास्त क्षमता वापर (५००० मे.टन पेक्षा जास्त) झाल्यास प्रत्यक्ष साठवणुक केलेल्या साठ्याचे भाडे देणे एजन्सीला बंधनकारक राहील. शेतकरी/व्यापारी/ शेतकरी उत्पादक संस्था, खाजगी कंपनी, आयात निर्यातदार संस्था, Joint Venture/भागीदारी संस्था इ. आर्थिकदृष्ट्या सक्षम असणाऱ्या आणि सायलो चालविण्याचा अनुभव असणाऱ्या इच्छुक निविदाकारांकडुन लिफाफा पद्धतीने सिलबंद निविदा/दरपत्रके मागविण्यात येत आहे. जास्तीत जास्त दर नमुद करणारी निविदा/दरपत्रक मान्य करण्यात येणार आहे.

| वखार केंद्राचे नाव व संपुर्ण पत्ता | सुविधा | प्रति महा एकुण भाडे दर रक्कम रु. + GST |
|---|---|---|
| जांबरगाव, गट नं-२४५, वैजापूर गंगापूर रोड, जांबरगाव, ता. वैजापूर, जि. छत्रपती संभाजीनगर-४२३ ७०१. | एकूण १०,००० मे.टन क्षमतेचे सायलो (प्रति सायलो २५०० मे.टन X ४)<br>वजनकाटा(६० मे.टन) | किमान भाडे रु.५०/- प्रति मे.टन.+GST |

तरी इच्छुक निविदाकारांनी निविदा/दरपत्रक सिलबंद लिफाफ्यात विभागीय कार्यालय, महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ, प्लॉट नं. ब-२६, एम.आय.डि.सी. एरिया, स्टेशन रोड, छत्रपती संभाजीनगर- ४३१००५ या पत्यावर कार्यालयात दि.०७/०४/२०२६ ते दि.२१/०४/२०२६ या कालावधीत सायंकाळी ४:०० वाजेपर्यंत.(सुट्टीचे दिवस सोडून) पोहोच होतील अश्याबेताने पाठवाव्यात किंवा स्वतः प्रत्यक्ष पोहच कराव्यात. प्राप्त निविदा/दरपत्रके विभागीय कार्यालय, छत्रपती संभाजीनगर यांचे कार्यालयात दि.२१/०४/२०२६ रोजी दुपारी ५:०० वाजता उघडण्यात येतील. सदर वेळी इच्छुक निविदाकार वरील नमूद पत्त्यावर उपस्थित राहू शकतील.

सदर बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढाली बाबत मागील तीन वर्षाचा Audited Report आणि IT return तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र सायलो साठवणूक सुविधा चालविण्याबाबतचे अनुभव असल्याचे प्रमाणपत्र इ. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत.

- निविदेमधील अटी व शर्ती महामंडळाच्या www.mswarehousing.com या संकेतस्थळावर पाहता येईल.
- वरील सर्व निविदा कोणतेही कारण न देता, निविदा, स्वीकारण्याचा अथवा नाकारण्याचा अधिकार महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ यांनी राखून ठेवलेला आहे.
- निविदा धारकाने जाहिरातीत नमुद केलेली सुविधेची प्रत्यक्ष साईट वर भेट देऊन पाहणी/खात्री करावी त्यानंतरच निविदा सादर करण्यात यावी.

**अध्यक्ष व व्यवस्थापकीय संचालक**


**पत्ता** :-विभागीय कार्यालय,
महाराष्ट्र राज्य वखार महामंडळ,प्लॉट नं. ब-२६, एम.आय.डि.सी. एरिया,
स्टेशन रोड,छत्रपती संभाजीनगर - ४३१००५.
ई-मेल :- aurangabad.ro@mswc.in मो. न.: - ९५५२६७२३००, ८८८८०७०२९७, ९९७०६३३९७१.

**महामंडळाचे जांबरगाव, ता. वैजापुर येथील सायलो साठवणुक सुविधा व वजनकाटा (६० मे.टन) भाड्याने देणेबाबत निविदेमधील अटी व शर्ती पुढीलप्रमाणे आहे.**

- जांबरगाव येथील १०००० मे.टन क्षमतेचे सायलो (२५०० मे.टन. X ४) भाडे तत्वावर घेणे करिता इच्छुक निविदाकार प्रति माह किमान भाडे दर रू.५०/- प्रति मे.टन + जी.एस.टी. किंवा त्यापेक्षा जास्त भाडे दर सादर करू शकतील.
- जांबरगाव येथील एकुण १०००० मे.टन क्षमतेचे सायलो सुविधा (प्रत्येकी २५०० मे.टन X ४ सायलो) व वजनकाटा (६० मे.टन) या सुविधा प्रती महा किमान भाडे दर रू.५०/- प्रति मे. टन प्रमाणे ११ महिन्यांकरिता प्रायोगिक तत्वावर भाडे करारावर द्यायचे आहे. सायलो भाडे करारावर दिल्यानंतर साठवणुक क्षमतेचा वापर ५०% पेक्षा कमी झाल्यास किमान ५०% साठवणुक क्षमतेचे (५००० मे.टन) भाडे देय राहील. तसेच ५०% पेक्षा जास्त क्षमता वापर (५००० मे.टन पेक्षा जास्त) झाल्यास प्रत्यक्ष साठवणुक केलेल्या साठ्याचे भाडे देणे एजन्सीला बंधनकारक राहील.
- शेतकरी, व्यापारी, शेतकरी उत्पादक कंपनी/संस्था, व्यापारी कंपनी, आयात निर्यातदार संस्था Joint Venture तसेच भागीदारी संस्था सदर निविदा प्रक्रिये मध्ये सहभागी होवु शकतात.
- सायलो साठवणुक सुविधा व वजनकाटा (६० मे.टन), **'जसे आहे त्या स्थितीत'** ताब्यात देण्यात येईल.
- तथापि भाडे तत्वावरील कालावधी समाप्तीनंतर काही नुकसान झाल्याचे निदर्शनास आल्यास सुरक्षा ठेव रक्कमेतुन सदरच्या दुरूस्तीचा खर्च वसुल करण्यात येईल.
- सायलो साठवणुक सुविधेचा विमा महामंडळाकडुन केला जाईल.
- सायलो साठवणुक सुविधा, साठ्याच्या देखभालीसाठी एकुण मनुष्यबळाचा खर्च व इतर खर्च ठेविदाराकडुन केला जाईल.
- करारनाम्यात नमुद दराने प्रत्येक महिन्याला १० तारखेपर्यंत सायलो साठवणुक भाडे रक्कम महामंडळाच्या खात्यावर RTGS/NEFT द्वारे जमा करणे ठेवीदार यांना बंधनकारक राहील.
- ठेवीदार यांनी सायलो साठवणुक सुविधेमध्ये साठवलेल्या मालाचा विमा काढणे व सदर विम्याची प्रत केंद्र प्रमुख, यांचेकडे १० दिवसात सादर करणे आवश्यक राहील.
- तीन महिना कालावधीचे साठवणुक भाडे इतकी रक्कम विनाव्याज सुरक्षा तारण (Security Deposit) ठेव म्हणुन महामंडळाकडे जमा करावी लागेल.
- सायलो साठवणुक सुविधा, वे-ब्रीज करारनामा रद्द करावयाचा असल्यास ठेवीदाराकडुन ३ महिने आधी नोटीस दिली जाईल किंवा वखार महामंडळास सायलोची व वे-ब्रीजची आवश्यकता भासल्यास महामंडळाकडुन कंपनीला १ महिना आधी नोटीस दिली जाईल.
- वे-ब्रीज आणि सायलो साठवणुक सुविधा आरक्षित जागेतील साठवणुकीमुळे किंवा इतर कोणत्याही कारणामुळे ठेवीदार यांना तोटा झाल्यास त्यास महामंडळ जबाबदार राहणार नाही.
- जांबरगाव वखार केंद्रावर सायलो आणि वे-ब्रीज परिसरात निर्माण होणाऱ्या कचऱ्याची विल्हेवाट लावण्याची जबाबदारी ठेवीदार यांची राहील. तसेच दोन्ही परिसरात घाण होणार नाही याची ठेवीदार यांनी काळजी घेणे आवश्यक आहे.
- सायलो सुविधा आणि वे-ब्रीजबाबत आरक्षण मंजुर कालावधी करिता नोंदणीकृत करारनामा करावा लागेल.

- करारनामा नोंदणीचा व मुद्रांक शुल्काचा व त्या अनुषंगीक बाबींचा सर्व खर्च सदर ठेविदाने करावयाचा आहे. महामंडळाच्या सायलो व वे-ब्रीज संदर्भातील अटी व शर्ती ठेवीदार यांना मान्य असल्याबाबतचे संमती पत्र महामंडळास सादर करावे लागेल.
- ठेवीदार यांना व्यवसायासाठी लागणाऱ्या प्राथमिक तसेच आवश्यक सोयी जसे स्वच्छतागृह, पाणी, वीज, पाण्याची टाकी, फायर फायटींग पंप, सॅन्ड बकेट इत्यादी ठेवीदाराने स्वतःच्या खर्चाने उपलब्ध करून घ्यावयाच्या आहेत. त्या आवश्यक सोयी उपलब्ध करून देण्यासाठी आवश्यक असणाऱ्या परवानग्या महामंडळाने द्यावयाच्या आहेत.
- सायलो साठवणुक सुविधा आणि वे-ब्रीज बाबत आवश्यकतेनुसार ठेवीदाराच्या खर्चाने CCTV बसविणेत यावेत. तसेच गोदामाची तसेच साठवणुक केलेल्या मालाची सुरक्षेबाबत योग्य ती दक्षता घेण्यात यावी.
- विद्युत पुरवठा तसेच शासकीय परवाने/परवानग्या घेण्याची जबाबदारी ठेवीदार यांची राहील. त्यासाठी आवयश्यक असणाऱ्या संमती महामंडळाने द्यावयाच्या आहेत.
- एकुण भाडे देयकावर TDS १०% कपात करून प्रमाणपत्र संबंधित केंद्रप्रमुख यांचेकडे सादर करावे.
- दरपत्रक सादर करण्यात येणाऱ्या बंद लिफाफ्यामध्ये इच्छुक निविदाकारांनी त्यांचे आर्थिक उलाढालीबाबत मागील तीन वर्षाचा Audited Report आणि IT return तसेच GST नोंदणी प्रमाणपत्र तसेच कायदेशीर कागदपत्रे व सायलो साठवणुक सुविधा चालविण्याबाबत अनुभव असल्याचे प्रमाणपत्र इ. आवश्यक कागदपत्रे सोबत जोडावीत.
- निविदा धारकाने जाहिरातीत नमुद केलेली सुविधेची प्रत्यक्ष साईट वर भेट देवुन पाहणी/खात्री करावी. त्यानंतरच निविदा सादर करण्यात यावी.
- वरील अटी व शर्ती मान्य असल्याचे निविदाकारांने दरपत्रकासोबत हमीपत्र सादर करणे बंधनकारक आहे.

*************************************